दिनांक :– १८.०६.२०१९.

# प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक देविदास उमाजी शेळके, पोलीस हेडकॉन्स्टेबल,ब.नं.६२०, वर्ग–३, पोलीस स्टेशन गोरेगाव, ता.सेनगाव जि.हिंगोली याचेवर यशस्वी सापळा कारवाई.**

---

पिडीत तकारदार यांनी दि. १७.०६.२०१९ रोजी तक्रार दिली की, त्यांचे तकारीवरुन पो.स्टे.गोरेगाव येथे दाखल असलेल्या गुन्हयात आरोपींना अटक करुन गुन्हाचा तपास चांगला करुन आरोपीविरुध्द चार्जशीट लवकर दाखल करनेसाठी . देविदास उमाजी शेळके, पोलीस हेडकॉन्स्टेबल हे त्यांचेकडे १,०००/– रू. च्या लाचेची मागणी करीत असल्याबाबत ला.प्र.वि हिंगोली कार्यालयात तक्रार दिली.

तकारदार यांचे तकारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी वरुन आरोपी लोकसेवक देविदास उमाजी शेळके, पोलीस हेडकॉन्स्टेबल यांनी तकारदाराकडे १,०००/–रू. च्या लाचेची मागणी करून १०००/– रू. लाच स्विकारली म्हणून आरोपी लोकसेवक देविदास उमाजी शेळके, पोलीस हेडकॉन्स्टेबल यांना लाचेच्या रकमेसह आज दि.१८.०६. २०१९ रोजीचे ताब्यात घेण्यात आलेले आहे. पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी श्री.संजय लाटकर, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री हनुमंत गायकवाड यांनी पोलीस निरीक्षक श्री नितीन देशमुख, पोह श्री सुभाष आढाव, पोह श्री अभिमन्यु कांदे, पोह श्री विजय उपरे, पोना श्री शेख जमिर, श्री संतोष दुमाने, श्री विनोद देशमुख, श्री रुद्र कबाडे, पोशि श्री प्रमोद थोरात, श्री अवि किर्तनकार, चापोकॉ श्री शहाजी बामणिकर यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यप्रणाली बाबत वा तकारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तकारदार यांना तकार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क.१०६४**, दुरध्वनी क.०२४५६–२२३०५५,
श्री संजय लाटकर, पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, लाप्रवि नांदेड.
मोबाईल कमांक. ९९२३०२८१२२, दुरध्वनी क ०२४६२–२५५८११.
मोबाईल कमांक ८८८८७१७९९९, ९९२३०४२५६५.

Scanned by CamScanner